REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

*" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।* —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ | पुणें. बुधवार तारीख ११ आक्टोबर, १९५० | अंक ४१

॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

मेसर्स स्कोडा कंपनीला नवीन एक हजार टनांच्या मशिनरीची रक्कम देण्याकरितां दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. पुणें, या बँकेकडून ६ टक्के व्याजानें सिंडिकेटनें चवदा लक्ष ( १४,००,००० ) रुपये कर्ज घेतलें होतें. सदर कर्जाची व्याजासह संपूर्ण फेड सिंडिकेटनें केलेली आहे. बँकेचा कोणचाहि बोजा सिंडिकेटच्या कोणच्याहि मिळकतीवर राहिलेला नाहीं.

योग्य वेळीं बँकेनें आपलेपणानें सिंडिकेटला मोठी आर्थिक मदत केली याबद्दल सिंडिकेट बँकेची फार आमारी आहे.

नवीन १००० टनांच्या मशिनरीच्या उभारणीला लागणाऱ्या रकमेकरितां

★ भागीदारांनीं सूचना केली तीः– ★

( १ ) सिंडिकेटच्या भागीदारांना, ठेवीदारांना व हितचिंतकांना एक वर्ष मुदतीच्या ६ टक्के व्याजानें ठेवी देण्याबद्दल प्रथम विनंति करावी.

( २ ) चालू २५० टनांच्या मशिनरीनें ३० नोव्हेंबरपासून दर महिन्याला अंदाजें सात लक्ष रुपयांची साखर तयार होऊं लागेल. दर महिन्याच्या तयार साखरेची विक्रीची रक्कम सरकारी नियंत्रण राहिलें तरी मार्च १९५१ पर्यंत सिंडिकेटला मिळूं शकेल. त्या मानानें मार्च १९५१ नंतर १ वर्ष ६ टक्के दराच्या ठेवींची मागणी कमी करावी.

★ ठेवींची मुदत १ वर्ष : व्याज ६ टक्के ★

मुदतीच्या ठेवीचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

पुणें, ता. १७-९-१९५०.
कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव पेठ, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंटस्.

दळणाच्या चक्क्या–टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**कर्जाचा विचार रहित**—नाणे–बाजाराची परिस्थिति अनुकूल नसल्यानें म्हैसूर सरकारनें ५ कोटी रुपयांचें कर्ज उभारण्याचा आपला बेत रहित केला आहे, असें प्रधानमंत्री श्री. के. सी. रेड्डी ह्यांनीं जाहीर केलें आहे. म्हैसूर संस्थानांत बेकायदा दारूच्या भट्ट्या वाढल्याचेंही त्यांनीं सांगितलें.

**इटलीची शस्त्रास्त्र वाढ**—इटलीशीं झालेल्या तहाप्रमाणें त्या देशाला १२ तुकड्या सैन्य ठेवण्याची परवानगी आहे. आपलें सैन्य त्या मर्यादेपर्यंत वाढविण्यासाठी जरूर असलेलीं शस्त्रास्त्रें तयार करण्याचें इटलीनें ठरविलें आहे. एकूण ८·६ कोटी पौंड किंमतीच्या शस्त्रास्त्रांच्या मागण्या कारखान्यांकडे नोंदण्यांत आल्या आहेत.

**पाकिस्तान जपानी एंजिनें घेणार**—पाकिस्ताननें जपानकडून डिझेल तेलावर चालणाऱ्या १० रेल्वेगाड्या मागविण्याचें ठरविलें आहे. ह्या गाड्या व वॅगन्स मिळून ३५ लाख रुपये किंमत पडणार आहे. ह्याशिवाय डिझेल व विजेवर चालणारीं २३ रेल्वे एंजिनेंही जपानकडून आयात करण्यांत येणार आहेत.

**अणुबॉम्बपासून संरक्षण**—न्यूयार्कमधील सर्वांत उच्च प्रतीच्या हॉटेलचे मालक प्रिन्स ओबोलेन्स्की ह्यांनीं अणुबॉम्बपासून संरक्षण करण्यासाठी शहरांतील पहिला भूमिगत आसरा बांधला आहे. जमिनीखालीं दोन मजले बांधण्यांत आले आहेत. प्रिन्स ओबोलेन्स्की हे रशियन आहेत.

**अॅटम बॉम्बपासून संरक्षण**— न्यूयार्कमधील एका विलासी हॉटेलनें अॅटम बॉम्बपासून संरक्षण करण्याच्या हेतूनें तळ मजल्याच्याखालीं दोन मजले एक भुयार बांधलें आहे. ह्या भुयारांत हॉटेलमधील पाहुणे आणि हॉटेलचे नोकर मिळून ५०० माणसांची सोय करण्यांत आली आहे.

**भारताचें गव्हाचें उत्पादन**—भारत सरकारच्या शेतकी खात्यानें असा अंदाज केला आहे कीं चालू वर्षी गेल्या वर्षापेक्षा ११.७ टक्के अधिक गव्हाचें उत्पादन झालें.

**अमेरिकन जनतेची मदत**—आसाममधील आपद्ग्रस्तांना 'केअर' ह्या अमेरिकन संस्थेकडून अन्नाची मदत धाडण्यांत येत आहे. आतां काश्मीरमधील पुरामुळें निराधार झालेल्या लोकांनाही ह्या संस्थेतर्फे अन्नाचीं पार्सलें पाठविण्यांत येणार आहेत. प्रत्येक पार्सलांत १० पौंड तांदूळ, ३ पौंड दुधाची भुकटी, ५ पौंड साखर व ५ पौंड वाळवलेले वांटाणे, १ पौंड साबण आणि ८ औंस टॉफी इत्यादी वस्तु असतात. एका पार्सलचें वजन ३२॥ पौंड असतें.

**पाकिस्तानची तागाची निर्यात**—पोर्तुगाल आणि पोर्तुगाल ईस्ट आफ्रिका ह्या देशांना निर्यात करण्यांत येणाऱ्या कच्च्या तागांत वाढ करण्याचें पाकिस्ताननें ठरविलें आहे. आतां ५,००० टनांऐवजी १०,००० टन ताग निर्यात करण्यांत येईल.

**केळीच्या खुंटापासून दोर**—३० वर्षांपूर्वी स्वदेशीची चळवळ जोरांत असतांना केळीच्या खुंटापासून धागे तयार करण्याच्या धंद्याला उत्तेजन देण्यांत येत असे. ह्या खुंटांपासून होणारा धागा तागाच्या धाग्यासारखाच मजबूत असतो. आतां स्वातंत्र्य आल्यावर मात्र समारंभप्रसंगीं उभारण्यांत येणारे खुंट कचऱ्याच्या पेटींत जातात. जपानमध्यें कसल्याही भिकार वस्तूंचा उपयोग करून घेण्याची पद्धत आहे.

**डॉ. जयकरांचा सन्मान**—बनारस हिंदु विद्यापीठानें डॉ. एम्. आर. जयकर ह्यांना एलएल्. डी. ची पदवी देण्याचें ठरविलें आहे. विद्यापीठाचें पदवीदान डॉ. जयकर ह्यांच्याच हस्तें करण्यांत येणार आहे.

**मद्रास प्रांतांतील वीज केंद्र**–मद्रास सरकारनें नेलोर येथें एक नवीन वीज केंद्र उभारलें आहे. ह्या केंद्राला ५९ लाख रु. खर्च आला आहे. त्यांत ५,००० किलोवॅट वीज निर्माण होईल. केंद्रांत निर्माण झालेली वीज गुंतूर जिल्ह्याला पुरविण्यांत येणार आहे. त्यासाठी ३० मैल लांबीच्या तारा टाकण्यांत आल्या आहेत.

**चार्ली चॅपलिनचा नवा बोलपट**—सुप्रसिद्ध विनोदी नट चार्ली चॅपलिन हा इंग्लंडमध्यें जाऊन 'लाईम लाइट' ह्या नांवाचा नवीन बोलपट काढण्याच्या विचारांत आहे. परंतु तसें करण्यापूर्वी त्याला अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याकडून परवाना मिळविणें जरूर आहे. नव्या चित्रपटाची कथा बऱ्याच वर्षाच्या दीर्घ श्रमानंतर तयार झाली आहे. चार्ली चॅपलिन हा १९१० पासून अमेरिकेंत असला तरी त्यानें अमेरिकेचें नागरिकत्व पत्करलेलें नाहीं.

**पसरत चाललेलें वाळवंट**—भारताच्या वायव्येला असलेलें कच्छचें रेताड वाळवंट हळूहळू उत्तर गुजराथ भागांत पसरत चाललें असल्याचें कळतें. ह्या बदलाचें स्वरूप समजावून घेण्यासाठी आणि तसें घडत असल्यास त्याला अटकाव घालण्यासाठी उपाय सुचविणारी एक कमिटी मुंबई सरकारनें नेमली आहे. कांहीं भाग वाळवंटाखालीं गेला असल्यास त्याबद्दलही कमिटीनें उपाय सुचवावयाचे आहेत.

**सक्तीची कर्ज उभारणी**—इस्रायल मधील बँकांच्या ठेवीदारांपैकी सर्व ठेवीदारांच्या ठेवींपैकी ६ टक्के रक्कम सरकारच्या सक्तीच्या कर्जांत भरती करण्याचें इस्रायल सरकारनें ठरविलें आहे. ह्या रकमेऐवजीं ठेवीदारांना सरकारचे कर्जरोखे देण्यांत येणार आहेत. सक्तीच्या कर्ज–उभारणीमुळें इस्रायल सरकारला राष्ट्रसंवर्धक कार्यासाठी १० कोटी पौंड मिळणार आहेत.

**पहिल्या महायुद्धाचा बळी**—मि. जेम्स बॅरो नांवाचा एक ब्रिटिश सैनिक १९१४ ते १८ च्या पहिल्या महायुद्धांत छातींत गोळी लागून जखमी झाला होता. छातींत गोळी असल्याचें ३४ वर्षांपूर्वीच समजलें होतें; परंतु ती काढतां येण्यासारखी नव्हती. हा सैनिक नुकताच मेला. त्यावेळीं पहिल्या महायुद्धाचा बळी असें त्याचें वर्णन करण्यांत आलें.

**रशियाला इराणचें तेल**—रशिया आणि इराण ह्यांच्यांत तेलासंबंधीं एक करार नुकताच करण्यांत आला आहे. ह्या कराराला अजून इराणच्या मुख्य मंत्र्यांची मंजुरी मिळाली नाहीं; परंतु ती मिळाल्यास उत्तर इराणमधील सर्व तेल रशियाला खरेदी करतां येईल. ह्या कराराप्रमाणें तेल उपसण्याची यंत्रसामुग्री रशिया पुरविणार असून तिचा ताबा इराणकडे रहाणार आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ११ आक्टोबर, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे




## रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

### खर्च वाढला तरी, नफ्यांत वाढ

रिझर्व्ह बँकेचें उत्पन्न १ जुलै, १९४९ ते ३० जून, १९५० ह्या वर्षी १२ कोटी, ९० लक्ष रु. झालें. खर्च वजा जातां निव्वळ नफा ९ कोटी, ९१ लक्ष रु. उरला, तो सरकारास मिळाला. गेल्या वर्षी ८ कोटी, ९६ लक्ष रु. नफा उरला होता. म्हणजे, नफा ९५ लाखांनीं वाढला. व्याजाचें उत्पन्न जास्त झालें आणि सरकारी रोख्यावरील घसाऱ्याची तरतूद कमी प्रमाणावर करावी लागली, हें त्याचें कारण आहे. व्याजाच्या बाबींत सुधारणा झाली, तरी डिस्कौंट व एक्सचेंज ह्यांचें उत्पन्न कमी झालें. स्टार्लिंग ट्रेझरी बिलांतील बँकेची गुंतवणूक उतरली आणि शेड्यूल्ड बँकांना कमी स्टार्लिंगची विक्री झाली, त्याचा हा परिणाम आहे. खर्चामध्यें ३५ लाखांची वाढ आढळते. छपाईचा खर्च हा वाढलाच, परंतु मुख्य म्हणजे २६ जानेवारी, १९५० रोजीं प्रसृत करावयासाठीं अशोक स्तंभाच्या चलनी नोटांसाठीं इंडिया सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेसला मोठी ऑर्डर देण्यांत आली. त्यामुळें ' सिक्युरिटी प्रिंटिंग ' च्या खर्चांत वाढ दिसते. बँकिंग ऑपरेशन्सच्या खात्याचें काम वाढलें आहे, त्यामुळें त्या खात्यांतील अधिकारी व नोकरवर्ग ह्यांची संख्या वाढवावी लागली. म्हणून एस्टॅब्लिशमेंट खर्च ११ लाखांनीं वाढ दाखवीत आहे.

### भागीदारांना नुकसानभरपाई

रिझर्व्ह बँकेचे एकूण ५००,००० शेअर्स होते. बँकेचें राष्ट्रीयीकरण केल्यानंतर, नुकसानभरपाई मिळण्यासाठीं बँककडे ३० जून, १९५० अखेर ४,५९,९६९ शेअर्स दाखल झाले. शेअर होल्डर्सना आतांपर्यंत ५ कोटी, ८ लक्ष रु. नुकसानभरपाई ३% पहिलें डेव्हलपमेंट कर्जा (१९७०–७५) च्या स्वरूपांत देण्यांत आली असून ३१ लक्ष रु. रोख दिलेले आहेत.

### बँकेच्या इमारती

रिझर्व्ह बँकेमधील कामाची जागा अपुरी पडत असल्यामुळें, बँकेनें शेजारील बिल्डिंग खरेदी केली आहे. त्या इमारतीवर आतां बँकेनें आणखी एक मजला चढविला आहे. तेथें बँकेचें एक्सचेंज कंट्रोल खातें हालविण्यांत आलें आहे. बँकेच्या, मुंबई येथील नोकरांसाठीं बिऱ्हाडाची सोय करण्याचे बाबतींत बरीच प्रगति झाली आहे. लॅमिंग्टन रोड, भायखळा आणि माटुंगा येथील सुमारें, १००० कुटुंबांच्या सोईच्या इमारतींचे नकाशे तयार झाले आहेत. दोन-तीन वर्षांत सबंध योजना पुरी होईल. माटुंगा येथें एक इमारत खरेदी केली आहे त्यांत सुमारें १० अधिकाऱ्यांचीं बिऱ्हाडें राहूं शकतील. कलकत्ता येथेंहि ४०० बिऱ्हाडांच्या सोईची व्यवस्था करण्यांत येत आहे. नागपूर आणि दिल्ली येथें बँकेच्या इमारतींचें काम लवकरच हातीं घेतलें जाईल. पाटणा, लखनौ, भुवनेश्वर आणि चांदीगड येथेंहि इमारतींसाठीं जागा मिळविण्याच्या वाटाघाटी चालू आहेत.

### बँकिंग खातें

बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या ३६ (२) कलमाप्रमाणें, रिझर्व्ह बँकेनें दरसाल मध्यवर्ती सरकारला देशांतील बँकिंगच्या परिस्थितीबाबत व प्रगतीबाबत तपशीलवार अहवाल सादर करावयाचा असतो. बँकिंगविषयक सुधारणा सुचविण्याचें कामहि रिझर्व्ह बँकेस सांगण्यांत आलेलें आहे. १९४९ विषयक हा रिपोर्ट तयार झाला असून तो लवकरच सरकारकडे पाठविला जाईल.

भारतांतील बँकांवरील देखरेखीचे व नियंत्रणाचे सर्व अधिकार रिझर्व्ह बँकेमध्यें एकत्रित करण्यांत आलेले आहेत. त्या संबंधांतील रिझर्व्ह बँकेचीं मुख्य कर्तव्यें खालील प्रमाणें आहेत:—

(अ) बँकांवर देखरेख व त्यांची तपासणी
(ब) बँकांना परवाने देणें आणि शाखा उघडण्यावर नियंत्रण.
(क) ॲरेंजमेंट व ॲमॅलगमेशन योजना तपासणें व मंजूरी.
(ड) बँकिंग कंपन्यांचें लिक्विडेशन.
(इ) भरून आलेल्या ठराविक तक्त्यांची छाननी.
(ई) बँकांना सल्ला आणि अडचणीचे वेळीं मदत.

### (अ) देखरेख व तपासणी

बँकिंग कंपनीज ॲक्ट पास झाल्यापासून आणि रिझर्व्ह बँक कायद्याच्या ४२ (६) कलमांत दुरुस्ती झाल्यापासून रिझर्व्ह बँकेचें शेड्यूल्ड व बिगर शेड्यूल्ड बँकांशीं नातें बदललें आहे. रिझर्व्ह बँकेला बँकांची स्वतः होऊन विविध कारणांसाठी तपासणी करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. हीं नवीं कर्तव्यें पार पाडण्यासाठीं रिझर्व्ह बँकेनें सर्व बँकांची पद्धतशीर वेळोवेळ तपासणी करण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक बँकेची वर्षांतून एकदा तपासणी व्हावी, असें अंतिम ध्येय आहे आणि त्या दृष्टीनें जरूर तो नोकरवर्ग वाढविण्यांत येत आहे. हा नोकरवर्ग कामांत वाकबगार होण्यास थोडा वेळ अर्थातच लागेल. तोपर्यंत न थांबता, शक्य तितक्या बँकांची तपासणी करण्यांत येईल.

### (ब) परवाने आणि शाखा नियंत्रण

बँकिंग कंपनीज ॲक्टप्रमाणें प्रत्येक बँकिंग कंपनीला रिझर्व्ह बँकेकडे बँकिंगचा व्यवसाय करण्यासाठीं अर्ज करावा लागतो. तो मंजूर करून लायसेन्स देण्यापूर्वी, अर्जदार बँक ठेवीदारांचे पैसे ठरावाप्रमाणें देण्यास क्षम आहे आणि बँकेचा कारभार ठेवीदारांच्या हितास बाधक होईल अशा रीतीनें चालविला जात नाहीं, ह्याची रिझर्व्ह बँकेला खात्री करून घ्यावी लागते. १९५२ अखेरपर्यंत सर्व बँकांची लायसेन्सच्या पात्रतेच्या दृष्टीनें तपासणी पुरी होईल, अशी अपेक्षा आहे. बँकेला नव्या शाखांस परवानगी देतांनाहि तिची आर्थिक परिस्थिति, तिचा इतिहास, व्यवस्थेचा दर्जा, भाग भांडवलाचा पुरेपणा, नव्या शाखेची किफायतशीर होण्याची शक्यता, इत्यादि बाबतींत रिझर्व्ह बँक कसून चौकशी करते. १९४९–५० मध्यें ९५ शाखा उघडण्यासाठीं अर्ज आले, त्यांपैकीं रिझर्व्ह बँकेनें ६६ मंजूर केले. शाखांच्या स्थलांतराचे सर्व ६ अर्ज मंजूर करण्यांत आले.

दळणाच्या चक्क्या–टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**कर्जाचा विचार रहित**—नाणे–बाजाराची परिस्थिति अनुकूल नसल्यानें म्हैसूर सरकारनें ५ कोटी रुपयांचें कर्ज उभारण्याचा आपला बेत रहित केला आहे, असें प्रधानमंत्री श्री. के. सी. रेड्डी ह्यांनीं जाहीर केलें आहे. म्हैसूर संस्थानांत बेकायदा दारूच्या भट्ट्या वाढल्याचेंहा त्यांनीं सांगितलें.

**इटलीची शस्त्रास्त्र वाढ**—इटलीशीं झालेल्या तहाप्रमाणें त्या देशाला १२ तुकड्या सैन्य ठेवण्याची परवानगी आहे. आपलें सैन्य त्या मर्यादेपर्यंत वाढविण्यासाठी जरूर असलेलीं शस्त्रास्त्रें तयार करण्याचें इटलीनें ठरविलें आहे. एकूण ८६ कोटी पौंड किंमतीच्या शस्त्रास्त्रांच्या मागण्या कारखान्यांकडे नोंदण्यांत आल्या आहेत.

**पाकिस्तान जपानी एंजिनें घेणार**—पाकिस्ताननें जपानकडून डिझेल तेलावर चालणाऱ्या १० रेल्वेगाड्या मागविण्याचें ठरविलें आहे. ह्या गाड्या व वॅगन्स मिळून ३५ लाख रुपये किंमत पडणार आहे. ह्याशिवाय डिझेल व विजेवर चालणारीं २३ रेल्वे एंजिनेंही जपानकडून आयात करण्यांत येणार आहेत.

**अणुबॉम्बपासून संरक्षण**—न्यूयार्कमधील सर्वांत उच्च प्रतीच्या हॉटेलचे मालक प्रिन्स ओबोलेन्स्की ह्यांनीं अणुबॉम्बपासून संरक्षण करण्यासाठी शहरांतील पहिला भूमिगत आसरा बांधला आहे. जमिनीखालीं दोन मजले बांधण्यांत आले आहेत. प्रिन्स ओबोलेन्स्की हे रशियन आहेत.

**अॅटम बाँबपासून संरक्षण**— न्यूयार्कमधील एका विलासी हॉटेलनें अॅटम बॉम्बपासून संरक्षण करण्याच्या हेतूनें तळ मजल्याच्याखालीं दोन मजले एक भुयार बांधलें आहे. ह्या भुयारांत हॉटेलमधील पाहुणे आणि हॉटेलचे नोकर मिळून ५०० माणसांची सोय करण्यांत आली आहे.

**भारताचें गव्हाचें उत्पादन**—भारत सरकारच्या शेतकी खात्यानें असा अंदाज केला आहे कीं चालू वर्षी गेल्या वर्षापेक्षा ११.७ टक्के अधिक गव्हाचें उत्पादन झालें.

**अमेरिकन जनतेची मदत**—आसाममधील आपद्ग्रस्तांना 'केअर' ह्या अमेरिकन संस्थेकडून अन्नाची मदत धाडण्यांत येत आहे. आतां काश्मीरमधील पुरामुळें निराधार झालेल्या लोकांनाही ह्या संस्थेतर्फे अन्नाचीं पार्सलें पाठविण्यांत येणार आहेत. प्रत्येक पार्सलांत १० पौंड तांदूळ, ३ पौंड दुधाची भुकटी, ५ पौंड साखर व ५ पौंड वाळवलेले वाटाणे, १ पौंड साबण आणि ८ औंस टॉफी इत्यादी वस्तू असतात. एका पार्सलचें वजन ३२॥ पौंड असतें.

**पाकिस्तानची तागाची निर्यात**—पोर्तुगाल आणि पोर्तुगाल ईस्ट आफ्रिका ह्या देशांना निर्यात करण्यांत येणाऱ्या कच्च्या तागांत वाढ करण्याचें पाकिस्ताननें ठरविलें आहे. आतां ५,००० टनांऐवजी १०,००० टन ताग निर्यात करण्यांत येईल.

**केळीच्या खुंटापासून दोर**—३० वर्षांपूर्वी स्वदेशीची चळवळ जोरांत असतांना केळीच्या खुंटापासून धागे तयार करण्याच्या धंद्याला उत्तेजन देण्यांत येत असे. ह्या खुंटापासून होणारा धागा तागाच्या धाग्यासारखाच मजबूत असतो. आतां स्वातंत्र्य आल्यावर मात्र समारंभप्रसंगीं उभारण्यांत येणारे खुंट कचऱ्याच्या पेटींत जातात. जपानमध्यें कसल्याही भिकार वस्तूंचा उपयोग करून घेण्याची पद्धत आहे.

**डॉ. जयकरांचा सन्मान**—बनारस हिंदु विद्यापीठानें डॉ. एम्. आर्. जयकर ह्यांना एलएल्. डी. ची पदवी देण्याचें ठरविलें आहे. विद्यापीठाचें पदवीदान डॉ. जयकर ह्यांच्याच हस्तें करण्यांत येणार आहे.

**मद्रास प्रांतांतील वीज केंद्र**—मद्रास सरकारनें नेलोर येथें एक नवीन वीज केंद्र उभारलें आहे. ह्या केंद्राला ५९ लाख रु. खर्च आला आहे. त्यांत ५,००० किलोवॅट वीज निर्माण होईल. केंद्रांत निर्माण झालेली वीज गुंटूर जिल्ह्याला पुरविण्यांत येणार आहे. त्यासाठी ३० मैल लांबीच्या तारा टाकण्यांत आल्या आहेत.

**चार्ली चॅपलिनचा नवा बोलपट**—सुप्रसिद्ध विनोदी नट चार्ली चॅपलिन हा इंग्लंडमध्यें जाऊन 'लाईम लाइट' ह्या नांवाचा नवीन बोलपट काढण्याच्या विचारांत आहे. परंतु तसें करण्यापूर्वी त्याला अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याकडून परवाना मिळविणें जरूर आहे. नव्या चित्रपटाची कथा बऱ्याच वर्षांच्या दीर्घ श्रमानंतर तयार झाली आहे. चार्ली चॅपलिन हा १९१० पासून अमेरिकेंत असला तरी त्यानें अमेरिकेचें नागरिकत्व पत्करलेलें नाहीं.

**पसरत चाललेलें वाळवंट**—भारताच्या वायव्येला असलेलें कच्छचें रेताड वाळवंट हळूहळू उत्तर गुजराथ भागांत पसरत चाललें असल्याचें कळतें. ह्या बदलाचें स्वरूप समजावून घेण्यासाठी आणि तसें घडत असल्यास त्याला अटकाव घालण्यासाठी उपाय सुचविणारी एक कमिटी मुंबई सरकारनें नेमली आहे. कांहीं भाग वाळवंटाखालीं गेला असल्यास त्याबद्दलही कमिटीनें उपाय सुचवावयाचे आहेत.

**सक्तीची कर्ज उभारणी**—इस्रायल मधील बँकांच्या ठेवीदारांपैकी सर्व ठेवीदारांच्या ठेवीपैकी ६ टक्के रकम सरकारच्या सक्तीच्या कर्जांत भरती करण्याचें इस्रायल सरकारनें ठरविलें आहे. ह्या रकमेऐवजीं ठेवीदारांना सरकारचे कर्जरोखे देण्यांत येणार आहेत. सक्तीच्या कर्ज–उभारणीमुळें इस्रायल सरकारला राष्ट्रसंवर्धक कार्यासाठी १० कोटी पौंड मिळणार आहेत.

**पहिल्या महायुद्धाचा बळी**—मि. जेम्स बॅरो नांवाचा एक ब्रिटिश सैनिक १९१४ ते १८ च्या पहिल्या महायुद्धांत छातींत गोळी लागून जखमी झाला होता. छातींत गोळी असल्याचें ३४ वर्षांपूर्वीच समजलें होतें; परंतु ती काढतां येण्यासारखी नव्हती. हा सैनिक नुकताच मेला. त्यावेळीं पहिल्या महायुद्धाचा बळी असें त्याचें वर्णन करण्यांत आलें.

**रशियाला इराणचें तेल**—रशिया आणि इराण ह्यांच्यांत तेलासंबंधीं एक करार नुकताच करण्यांत आला आहे. ह्या कराराला अजून इराणच्या मुख्य मंत्र्यांची मंजुरी मिळाली नाहीं; परंतु ती मिळाल्यास उत्तर इराणमधील सर्व तेल रशियाला खरेदी करतां येईल. ह्या कराराप्रमाणें तेल उपसण्याची यंत्रसामुग्री रशिया पुरविणार असून तिचा ताबा इराणकडे रहाणार आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ११ आक्टोबर, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

### खर्च वाढला तरी, नफ्यांत वाढ

रिझर्व्ह बँकेचें उत्पन्न १ जुलै, १९४९ ते ३० जून, १९५० ह्या वर्षी १२ कोटी, ९० लक्ष रु. झालें. खर्च वजा जातां निव्वळ नफा ९ कोटी, ९१ लक्ष रु. उरला, तो सरकारास मिळाला. गेल्या वर्षी ८ कोटी, ९६ लक्ष रु. नफा उरला होता. म्हणजे, नफा ९५ लाखांनीं वाढला. व्याजाचें उत्पन्न जास्त झालें आणि सरकारी रोख्यावरील घसाऱ्याची तरतूद कमी प्रमाणावर करावी लागली, हें त्याचें कारण आहे. व्याजाच्या बाबींत सुधारणा झाली, तरी डिस्कौंट व एक्सचेंज ह्यांचें उत्पन्न कमी झालें. स्टर्लिंग ट्रेझरी बिलांतील बँकेची गुंतवणूक उतरली आणि शेड्यूल्ड बँकांना कमी स्टर्लिंगची विक्री झाली, त्याचा हा परिणाम आहे. खर्चामध्यें ३५ लाखांची वाढ आढळते. छपाईचा खर्च हा वाढलाच, परंतु मुख्य म्हणजे २६ जानेवारी, १९५० रोजीं प्रसृत करावयासाठीं अशोक स्तंभाच्या चलनी नोटांसाठीं इंडिया सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेसला मोठी ऑर्डर देण्यांत आली. त्यामुळें 'सिक्युरिटी प्रिंटिंग' च्या खर्चांत वाढ दिसते. बँकिंग ऑपरेशन्सच्या खात्याचें काम वाढलें आहे, त्यामुळें त्या खात्यांतील अधिकारी व नोकरवर्ग ह्यांची संख्या वाढवावी लागली. म्हणून एस्टॅब्लिशमेंट खर्च ११ लाखांनीं वाढ दाखवीत आहे.

### भागीदारांना नुकसानभरपाई

रिझर्व्ह बँकेचे एकूण ५००,००० शेअर्स होते. बँकेचें राष्ट्रीयीकरण केल्यानंतर, नुकसानभरपाई मिळण्यासाठी बँककडे ३० जून, १९५० अखेर ४,५९,९६९ शेअर्स दाखल झाले. शेअर होल्डर्सना आतांपर्यंत ५ कोटी, ८ लक्ष रु. नुकसानभरपाई ३% पहिलें डेव्हलपमेंट कर्ज (१९७०–७५) च्या स्वरूपांत देण्यांत आली असून ३१ लक्ष रु. रोख दिलेले आहेत.

### बँकेच्या इमारती

रिझर्व्ह बँकेमधील कामाची जागा अपुरी पडत असल्यामुळें, बँकेनें शेजारील बिल्डिंग खरेदी केली आहे. त्या इमारतीवर आतां बँकेनें आणखी एक मजला चढविला आहे. तेथें बँकेचें एक्सचेंज कंट्रोल खातें हालविण्यांत आलें आहे. बँकेच्या, मुंबई येथील नोकरांसाठीं बिऱ्हाडाची सोय करण्याचे बाबतींत बरीच प्रगति झाली आहे. लॅमिंग्टन रोड, भायखळा आणि माटुंगा येथील सुमारें, १००० कुटुंबांच्या सोईच्या इमारतींचे नकाशे तयार झाले आहेत. दोन-तीन वर्षांत सबंध योजना पुरी होईल. माटुंगा येथें एक इमारत खरेदी केली आहे त्यांत सुमारें १० अधिकाऱ्यांचीं बिऱ्हाडें राहूं शकतील. कलकत्ता येथेंहि ४०० बिऱ्हाडांच्या सोईची व्यवस्था करण्यांत येत आहे. नागपूर आणि दिल्ली येथें बँकेच्या इमारतींचें काम लवकरच हातीं घेतलें जाईल. पाटणा, लखनौ, भुवनेश्वर आणि चांदीगड येथेंहि इमारतींसाठीं जागा मिळविण्याच्या वाटाघाटी चालू आहेत.

### बँकिंग खातें

बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या ३६ (२) कलमाप्रमाणें, रिझर्व्ह बँकेनें दरसाल मध्यवर्ती सरकारला देशांतील बँकिंगच्या परिस्थितीबाबत व प्रगतीबाबत तपशिलवार अहवाल सादर करावयाचा असतो. बँकिंगविषयक सुधारणा सुचविण्याचें कामहि रिझर्व्ह बँकेस सांगण्यांत आलेलें आहे. १९४९ विषयक हा रिपोर्ट तयार झाला असून तो लवकरच सरकारकडे पाठविला जाईल.

भारतांतील बँकांवरील देखरेखीचे व नियंत्रणाचे सर्व अधिकार रिझर्व्ह बँकेमध्यें एकत्रित करण्यांत आलेले आहेत. त्या संबंधांतील रिझर्व्ह बँकेचीं मुख्य कर्तव्यें खालील प्रमाणें आहेत:—

(अ) बँकांवर देखरेख व त्यांची तपासणी
(ब) बँकांना परवाने देणें आणि शाखा उघडण्यावर नियंत्रण.
(क) ॲरेंजमेंट व ॲमॅलगमेशन योजना तपासणें व मंजूरी.
(ड) बँकिंग कंपन्यांचें लिक्विडेशन.
(इ) भरून आलेल्या ठराविक तक्त्यांची छाननी.
(ई) बँकांना सल्ला आणि अडचणीचे वेळीं मदत.

### (अ) देखरेख व तपासणी

बँकिंग कंपनीज ॲक्ट पास झाल्यापासून आणि रिझर्व्ह बँक कायद्याच्या ४२ (६) कलमांत दुरुस्ती झाल्यापासून रिझर्व्ह बँकेचें शेड्यूल्ड व बिगर शेड्यूल्ड बँकांशीं नातें बदललें आहे. रिझर्व्ह बँकेला बँकांची स्वतः होऊन विविध कारणांसाठीं तपासणी करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. हीं नवीं कर्तव्यें पार पाडण्यासाठीं रिझर्व्ह बँकेनें सर्व बँकांची पद्धतशीर वेळोवेळ तपासणी करण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक बँकेची वर्षांतून एकदा तपासणी व्हावी, असें अंतिम ध्येय आहे आणि त्या दृष्टीनें जरूर तो नोकरवर्ग वाढविण्यांत येत आहे. हा नोकरवर्ग कामांत वाकबगार होण्यास थोडा वेळ अर्थातच लागेल. तोपर्यंत न थांबता, शक्य तितक्या बँकांची तपासणी करण्यांत येईल.

### (ब) परवाने आणि शाखा नियंत्रण

बँकिंग कंपनीज ॲक्टप्रमाणें प्रत्येक बँकिंग कंपनीला रिझर्व्ह बँकेकडे बँकिंगचा व्यवसाय करण्यासाठीं अर्ज करावा लागतो. तो मंजूर करून लायसेन्स देण्यापूर्वी, अर्जदार बँक ठेवीदारांचे पैसे ठरावाप्रमाणें देण्यास क्षम आहे आणि बँकेचा कारभार ठेवीदारांच्या हितास बाधक होईल अशा रीतीनें चालविला जात नाहीं, ह्याची रिझर्व्ह बँकेला खात्री करून घ्यावी लागते. १९५२ अखेरपर्यंत सर्व बँकांची लायसेन्सच्या पात्रतेच्या दृष्टीनें तपासणी पुरी होईल, अशी अपेक्षा आहे. बँकेला नव्या शाखांस परवानगी देतांनाहि तिची आर्थिक परिस्थिति, तिचा इतिहास, व्यवस्थेचा दर्जा, भाग भांडवलाचा पुरेपणा, नव्या शाखेची किफायतशीर होण्याची शक्यता, इत्यादि बाबतींत रिझर्व्ह बँक कसून चौकशी करते. १९४९–५० मध्यें ९५ शाखा उघडण्यासाठीं अर्ज आले, त्यांपैकीं रिझर्व्ह बँकेनें ६६ मंजूर केले. शाखांच्या स्थलांतराचे सर्व ६ अर्ज मंजूर करण्यांत आले.

### इतर कर्तव्यांची पूर्तता

अॅरेंजमेंटची योजना ठेवीदारांच्या हितास बाधक होणार नाहीं असें रिझर्व्ह बँकेनें सर्टिफिकेट दिल्याविना .कोणत्याहि बँकेची असली योजना कोर्टाला मंजूर करता येत नाहीं. अशा १० बँकांच्या योजनांबाबतची तपासणी रिझर्व्ह बँकेनें १९४९–५० मध्यें केली. अॅमलगमेशनच्या योजना मंजूर व नामंजूर करण्याचा रिझर्व्ह बँकेस अधिकार आहे.

बँकांच्या लिकिडेशनसाठी तज्ज्ञ असा कांहीं नोकरवर्ग बँकेनें शिकवून तयार केला आहे.

कायदा व त्या खालील नियम ह्याप्रमाणें रिझर्व्ह बँकेकडे बँकांना तपशीलाचे तक्ते पाठवावे लागतात. हे सर्व तक्ते नीट तपासून, त्यांत आढळून आलेले दोष बँकांना दाखवून देण्याचें काम रिझर्व्ह बँक करीत असते.

रुपयाच्या अवमूल्यनामुळें सोडतीच्या व्यवहारांना प्रोत्साहन मिळेल, अशी भीति होती म्हणून बँकांनीं फक्त खऱ्या व्यापारी गरजा भागविणारींच कर्जे बँकांनीं द्यावीं असा त्यांस सल्ला देण्यांत आला होता. १ लाखावरील कर्जांचा तपशील त्यांनीं दररोज रिझर्व्ह बँकेकडे पाठविला पाहिजे असें त्यांचेवर बंधन होतें. अशा कर्जांत जीं अयोग्य आढळलीं, तीं परत मागविण्याचा सल्ला त्यांना देण्यांत आला होता.

बँकांच्या कोणत्याहि व्यवहारांत जेव्हां जेव्हां अनिष्ट प्रवृत्ति रिझर्व्ह बँकेस आढळून आली, कीं ती त्या बँकांच्या नजरेस आणून ती दुरुस्त करण्यास सांगण्यांत येई. त्या बँका हें काम नीट करतात किंवा नाहीं, हें पाहण्यासाठी त्यांचेकडून खास तक्ते वरचेवर मागविले जात असत.

---

**बँकांचें सुप्रीम कोर्टाकडे अपील**—इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल (बँक्स) च्या जुलै १९५० च्या निर्णयाविरुद्ध पांच बँकांनीं सुप्रीम कोर्टाकडे अपील केलें होतें. ह्या बँकांचीं नांवें अशीं : इंडियन बँक मद्रास, दि इंपीरियल बँक, दि सेंट्रल बँक, दि बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ बरोडा. ट्रायब्यूनलनें दिलेल्या निवाड्याविरुद्ध बऱ्याच मुद्यांविषयीं बँकांनीं दाद मागितली होती. परंतु बोनस, प्रॉ. फंड आणि बँकांचे वरिष्ठ अधिकारी हीं इंडस्ट्रियल डिस्प्यूटस अॅक्टखालीं येतात किंवा नाहीं येवढ्या तीन मुद्यांबाबतच सुप्रीम कोर्टानें अपिलें दाखल करून घेतलीं आहेत.

**साखरेच्या धंद्यांतील तज्ज्ञांची परिषद्**—डेकन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनची ७ वी वार्षिक परिषद् ता. १४ ऑक्टोबर रोजीं पुणें येथील शेतकी कॉलेजवर भरणार आहे. परिषद् तीन दिवस चालणार असून अध्यक्षस्थान श्री. लालचंद हिराचंद स्वीकारणार आहेत. परिषदेचे उद्घाटक प्रसिद्ध उद्योगपति श्री. तुळशीदास किलाचंद हे आहेत.

**कराचीला जागतिक बँकेचें शिष्टमंडळ**—जागतिक बँकेचें एक शिष्टमंडळ ता. १५ ऑक्टोबर रोजीं कराचीला जाणार आहे. पाकिस्ताननें बँकेकडे सादर केलेल्या आर्थिक विकासाच्या योजनासंबंधीं चर्चा करण्याचा शिष्टमंडळाचा हेतू आहे. पाकिस्ताननें सादर केलेल्या योजनांत शेती, उद्योगधंदे आणि वीजनिर्मितीची केंद्रें ह्यांचा समावेश आहे. शिष्टमंडळाचा मुक्काम पांच आठवडे आहे.

**कोल्हापूरला व्यापाऱ्यांची मध्यवर्ती संस्था**—कोल्हापूरमधील व्यापारी संघांची एक बैठक नुकतीच झाली ह्या बैठकींत कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स नांवाची एक मध्यवर्ती संस्था काढण्याचें ठरलें असें समजतें.

## मजुरांची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी ट्रेड युनियन कॉंग्रेसनें केलेले प्रयत्न

(भा. म. काळे)

ब्रिटनमध्यें मजुरांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी ट्रेड युनियन कॉंग्रेसतर्फे पुढील प्रकारचे विशेष प्रयत्न सध्यां चालू आहेत व ते यशस्वी होत आहेत. हल्लीं दर तासाला मजुरांचें उत्पादन कसें वाढविलें जाईल या दृष्टीनें प्रयत्न होत आहेत. ट्रेड युनियन कॉंग्रेसनें एक उत्पादनाचें खातें निर्माण केलें आहे, व त्या ठिकाणीं उद्योगधंद्यातल्या निरनिराळ्या नवीन मार्गांचा किंवा प्रकारांचा कसा उपयोग केला जातो हें शिकविलें जातें. विशेषत: अमेरिकेंतून प्रत्यक्ष उत्पादनाच्या पद्धती पाहून आलेले उद्योगपती यंत्रज्ञ व मजूर संघटनांचे अधिकारी यांच्याकडून, मजुरांची उत्पादनक्षमता कशी वाढवावी याबद्दल कुतूहल उत्पन्न झाल्यामुळें प्रयत्न चालू आहेत. या सर्वांचा परिणाम असा झाला आहे कीं, उद्योगधंद्यांचे प्रश्न सोडवितांना धंद्यांतील पुढारी त्यांचा शास्त्रीय दृष्टीनें विचार करतात. धंद्यांचे मालक व ट्रेड युनियनचे अधिकारी यांच्यामध्यें या दृष्टीनें हल्लीं विचारविनिमय होऊं शकतो. मालक व मजूर यांच्यामध्यें नवीन नवीन धंद्यांतील तंत्रें किंवा पद्धती याबाबतींत एकमत व्हावें या दृष्टीनें ट्रेड युनियन कॉंग्रेसच्या नेत्यांचे किंवा युनियनचे प्रयत्न चालू असतात. यामुळें मजुरांच्या दरांत वाढ व उत्पादनाची सुधारलेली परिस्थिति या दोनहि गोष्टी साध्य करण्याच्या दृष्टीनें ट्रेड युनियन कॉंग्रेसचे प्रयत्न सुरू आहेत. मजूर संघटना आपले पदाधिकारी नेमतांना ज्यांना प्रत्यक्ष निरनिराळ्या धंद्यांचा अनुभव आहे अशा अधिकारी लोकांची निवड करते. कारखान्यांतील कामाचा प्रत्यक्ष अनुभव ही ट्रेड युनियन कॉंग्रेसकडून महत्त्वाची गोष्ट समजली जाते. ट्रेड युनियन कॉंग्रेसचे विशेष प्रयत्न निरनिराळ्या वैयक्तिक संघटनांनीं शास्त्रीय व तांत्रिक ज्ञान वाढवावें या दृष्टीनें चालू असतात. ट्रेड युनियन कॉंग्रेसच्या उत्पादन कमिटीशीं एकवाक्यता करून युनियनचा सर्वसाधारण मंडळाच्या शिक्षण समितीनें असें ठरविलें आहे कीं आपल्या केंद्रांतून धंद्यांतील उत्पादन व व्यवस्था या बाबतींत निश्चित माहिती देणारा एक अभ्यासक्रम आंखण्यात यावा. या सुधारणेचा मुख्य हेतु उत्पादनाच्या व्यवस्थेबद्दलचें तांत्रिक शिक्षण ट्रे. यु. मार्फत देण्यांत यावें हा आहे. अमेरिकेला भेट देऊन आलेल्या उत्पादन कमिट्यांमार्फत निरनिराळ्या युनियनमध्यें नवीन मिळालेली माहिती पसरविली जाते. उत्पादनक्षमता साध्य करण्यासाठी अँग्लो अमेरिकन कौन्सिलमार्फत केल्या जाणाऱ्या कार्यांचा प्रसारहि केला जातो. निरनिराळ्या प्रादेशिक सभांतून उद्योगधंद्यांच्या बाबतींत कार्यक्षमता निर्माण करण्यासाठी दिसून आलेल्या योजनांची प्रत्यक्ष माहिती दिली जाते. यासाठी उत्पादनक्षमता साध्य करण्याच्या दृष्टीनें काय केलें जातें हें सर्वांना स्पष्टपणें कळावें म्हणून अलिकडे प्रदर्शनेंहि भरविलीं जातात. हे मार्ग हिंदमध्यें कितपत स्वीकारणीय आहेत याचा विचार झाला पाहिजे.

(ब्रि. इ. स. च्या आधारें)

---

**अलाहाबादजवळील खेड्यांत लांडग्यांचा उपद्रव**

संयुक्त प्रांतांतील एका जिल्ह्यांतील खेड्यांत लांडगे आणि तरस ह्यांचा उपद्रव फार वाढला आहे. गेल्या कांहीं दिवसांत ह्या मांसभक्षक प्राण्यांनीं १९ मुलें मारलीं असें कळतें. त्याशिवाय कांहीं वासरेंही त्यांच्या भक्ष्यस्थानीं पडलीं आहेत.

## पूर्व खानदेश सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., जळगांव

अहवालाचे सालीं प्रामुख्यानें नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे बँकेचे सन १९३७ पासून एकसारखे चेअरमन असलेले श्री. भगवंतराव दामोदर देशमुख ऊर्फ आबासाहेब यांची मुंबई राज्याचे उपमंत्री म्हणून नेमणूक झाल्यामुळें त्यांनीं नियमाप्रमाणें नाइलाजानें आपल्या बँकेच्या चेअरमनपदाचा राजिनामा दिला. त्यामुळें रिकाम्या झालेल्या चेअरमनपदाच्या जागीं संचालक मंडळानें सर्वानुमतें श्री. जुलालसिंग शंकरराव पाटील, बी. ए., एलएल. बी., चाळिसगांव ह्यांची निवड केली. खेड्यांत बँकिंग व्यवहाराचा प्रसार करण्याच्या सरकारी धोरणास अनुसरून बँकेनें ता. १३-२-१९५० रोजीं मुंबई राज्याचे माननीय उपमंत्री श्री. एस. टी. मोरे, एम्. एल्. ए. यांच्या हस्तें रावेर तालुक्यांत निंभोरे बु॥ येथें बँकेची एक उपशाखा उघडून बँकेच्या त्या वेळच्या सहा उपशाखेंत या सातव्या उपशाखेची भर घातली आहे. जून १९५० अखेर बँकेचें वसूल भाग भांडवल रु. ९,२६,३०० असून त्यांत मागील वर्षीपेक्षा रु. २४,६०० नें वाढ झाली आहे. जिल्ह्यांतून मिळविलेल्या ठेवीरूपी स्थानिक भांडवलावरच बँकेनें आपला सर्व व्यवहार नेहमीप्रमाणें अहवालाचे सालींही चालविलेला आहे अहवालाचे सालीं बँकेचे कार्यक्षेत्रांत निरनिराळ्या प्रकारच्या मिळून ५९ सोसायट्या नविन नोंदल्या गेल्या असून दोन सोसायट्या रद्द झाल्या आहेत. अहवालाचे सालीं सहकारी संस्थांना प्रत्यक्ष आदा केलेली चालू कर्जे ६२५ संस्थांना रु. २९,७३,१२६ व हंगामी कर्जे ६३० संस्था व ५५ व्यक्ति मिळून रु. ४८,६१,१९४ म्हणजे एकूण कर्ज रु. ७८,३४,३२० असून हाच आंकडा गेल्या वर्षी रु. ४७,६२,३२९ इतका होता. म्हणजे अहवालाचे सालीं दोन्ही प्रकारचीं कर्जे मिळून रु. ३०,७१,९०१ इतकीं कर्जे जास्त देण्यांत आलीं आहेत. अहवालाचे सालीं थकबाकीचें प्रमाण अवघें १० टक्के असून तें मागील सालाच्या थकबाकीचे प्रमाणापेक्षा २ टक्क्यांनीं कमीच आहे.

गेल्या सालीं बँकेस कापड ठोक विक्रेत्याचें काम मिळालें होतें. अहवालाचे सालीं हें काम सर्वसाधारणपणें सप्टेंबर माहेनाअखेर म्हणजे सुरवातीचे तिमाहीस जास्त प्रमाणांत होतें. त्यानंतर सरकारचें याबाबतींतील धोरण बदलल्यामुळें हें काम करण्याचें सहकारी संस्थांनीं सोडून दिलें. त्याचा सहाजिकच परिणाम या व्यवहारावर झाल्याविना राहिला नाहीं व या व्यवहाराकरितां १९४८-४९ सालांत सरासरी रु. २१ लाख इतके ठोक विक्रीचे कामाकरितां बँकेनें गुंतविले होते. हें काम अहवालाचे सालांत कमी झाल्यामुळें यावर्षी अशा प्रकारें गुंतविलेली रकम फारच अल्प म्हणजे सरासरी साडेतीन लाख इतकी आहे. यामुळें या व्यवहारांत चालूं वर्षी व्याजाचे रूपानें बँकेस जें उत्पन्न मिळालें तें फारच म्हणजे रु. ८३,३३७ नें घटलें आहे.

बँकेनें सहकारी संस्थांना दिलेल्या कर्जावरील व्याजाचा दर ४ टक्के केल्यामुळें बँकेस सोसायट्यांकडून मिळणारे व्याजाच्या उत्पन्नांत बरीच घट सोसावी लागली आहे. त्याचप्रमाणें हुंड्यांचे व्यवहाराबाबत नवीन जागरूकीचें धोरण स्वीकारल्यामुळें या व्यवहारापासून मिळणाऱ्या कमिशनमध्यें थोडीशी घट झालेली आहे. सहकारी संस्थांकडून थकलेल्या व्याजांत सुमारें २००० ची वाढ झाल्यामुळें त्याचाही परिणाम नफ्यावर झाला आहे. वरील सर्व कारणामुळें अहवालाचे सालीं बँकिंग व्यवहारांत झालेला नफा जवळ जवळ रु. ८०,००० नीं म्हणजेच गेल्या वर्षाचे नफ्याचे निम्म्यानें घटला आहे. असें असलें तरी बँकेच्या भागावरील नफ्याचा दर मात्र कायम आहे. शिफारशीप्रमाणें राखीव गंगाजळीची रकम वर्ग केल्यानंतर बँकेचा एकूण राखीव आंकडा रु. ९,७४,९९० होतो. अशा प्रकारें बँकेची राखीव गंगाजळी बँकेच्या वसूल झालेल्या भाग भांडवलापेक्षांही जास्त होते. डायरेक्टरांच्या रिपोर्टांतील ह्या माहितीवरून बँकेच्या गेल्या वर्षांतील कारभाराची कल्पना येईल. पू. खा. सें. को. बँक ही जिल्हा बँकांतील अग्रेसर बँक असून तिचें खेळतें भांडवल, १९४९-५० मध्यें ठेवी कांहीं प्रमाणांत कमी होऊनहि १ कोटी, ९० लक्ष रुपये आहे. बँकेचें स्वतःचें भांडवल सुमारें २५ लक्ष रुपये आहे. सहकारी संस्थांना व्याजाचा दर ४% करणारी ही पहिली बँक होय. १३ शाखा व ७ उपशाखा एवढा तिचा व्याप आहे. एवढ्या मोठ्या बँकेच्या प्रगतिपर कारभाराबद्दल तिच्या डायरेक्टर बोर्डाचें, मॅनेजिंग डायरेक्टरांचें व ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर ह्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. (चेअरमन: जुलालसिंग शंकरराव पाटील, बी. ए., एलएल. बी. मॅ डायरेक्टर: रा. या. सोनवणे, बी ए. ॲ. ऑफिसर: व्य. रा. शिंदे, बी. ए.)

---

## पुणें पोस्टल को. बँक लि.

वरील बँकेचे पटावर वर्षारंभीं १६७१ सभासद होते. त्यांची संख्या वर्षअखेर १८१७ झाली. अहवालाचे वर्षी ३ लक्ष, ४४ हजारांचीं नवीं कर्जे देण्यांत येऊन कर्जवसुली ३ लक्ष, ४ हजारांची झाली. सालअखेर येणें बाकी २ लक्ष, ७८ हजार रु. आहे. थकबाकीचें शेंकडा प्रमाण फक्त ३·१% आहे. बँकेनें चालू ठेवलेल्या धान्य दुकानांत कार्डांची संख्या ८७१ असून धान्य युनिटस १६४४ आहेत. धान्य दुकानाच्या व्यवहारांत अहवालाचे सालीं ५५७ रु. नफा झाला. पोस्ट व तार खात्यांतील नोकरांच्या सोयीकरतां एक कँटीन उघडण्याचें बँकेनें ठरविलें आहे. त्याप्रमाणें मंजुरी मिळून १-१०-५० पासून पुणें हेड ऑफिस, सेंट्रल टेलिग्राफ ऑफिस, व कॅरिअर बिल्डिंग (टेलिफोन एक्सचेंज) येथें कँटीन सुरू झालें आहे. त्याचा व्यवहार चालविण्यासाठीं निराळी सहकारी संस्था काढून तिचे हवालीं हा व्यवहार करणेचा आहे. अहवालाचे वर्षी बँकेस निव्वळ नफा ५,२२६ रु. झाला. ६% डिव्हिडंडला २,८३० रु. लागले. (चेअरमन: व्ही. जगदीश अय्यर. सन्मान्य चिटणीस: श्री. दा. पिंगळे.)

---

## पुणें शहर म्युनिसिपल सर्व्हंटस् कोऑपरेटिव्ह अर्बन बँक, लिमिटेड.

दि. १७।९।५० रोजीं झालेल्या वार्षिक निवडणुकीचा निकाल

**मा. सल्लागार मंडळ**—(१) मा. बा. द. शिंदे—अध्यक्ष, (२) मा. प्र. रा. महाजनी—उपाध्यक्ष, (३) मा. स. दा. कुलकर्णी, (४) मा. ग. शं. मोरे, (५) मा. दि. न. धाकस

**कार्यकारी मंडळ**

(१) मा. भी. म. कुलकर्णी (चेअरमन)

(२) मा. कृ. द. धारमळकर,— व्हाइस चेअरमन.

(३) मा. व. रा. कोतवाल, (४) मा. शं. श्री. देशपांडे, (५) मा. द. धों. कुऱ्हाडे, (६) मा. रा. द. भट, (७) मा. श्या. भि. भोपटकर, (८) मा. द. श्री. उदास, (९) मा. पु. कृ. कुलकर्णी (१०) मा. वि. द. नवले, (११) मा. द. ल. महगांवकर.

ऑडिटर—मा. गो. द. आपटे.

### दि नाणेघाट फ्युनिक्युलर ट्राम्वे अँन्ड ट्रान्स्पोर्ट कंपनी लि. पुणें,

अहवालाचे वर्षांत म्हणजे १९५० मध्यें कंपनीनें शेअरहप्त्यापैकी थकबाकी रु. ८७,००० वसूल करून शिवाय रु. ४८,७५० चे दर्शनी किंमतीचे शेअर्सची विक्री केली. ट्राम्वे यंत्रसामुग्रीचे चार हप्ते ( किंमत रु. ८६,१३७–१५–० ) कंपनीचे ताब्यांत येऊन ते नाणेघाट येथें कामावर पोंचविण्यांत आले. नाणेघाट ट्राम्वे योजना पुरी करण्याची मुदत सरकारनें सप्टेंबर १९५२ पर्यंत वाढविली आहे. खडक फोडण्याचें काम हातांत घेतलें असून, अतिशय अवघड कामापैकीं २/३ काम जून १९५० अखेर पुरें झालें आहे. ट्राम्वे–ऑर्डर प्रमाणें मुंबई सरकारनें लोकल ऑडिट–डिपार्टमेंटचे अधिकारी कंपनीचे हिशेब तपासण्याकरितां पाठविले होते. ३१–१२–४७ पर्यंत हिशेब तपासणी झाली असून, त्याचा सरकारी रिपोर्ट अद्याप हातांत आला नाहीं. नाणेघाट योजना पूर्ण करण्याकरितां अद्याप बऱ्याच मोठ्या रकमेची जरूर आहे. सेन १९५० मध्यें घाटाचे कामावर अजमासें पाऊण लाख रुपये खर्च करण्याचा डायरेक्टर्सचा विचार आहे. म्हणून शेअरहोल्डर्सनीं हें काम मनावर घेऊन स्वतः व मित्रांकरवीं शेअर्स खरेदी करून भांडवल उभें करावें अशी डायरेक्टरांची विनंति आहे. यामुळें ही योजना लौकर पुरी होईल व जुन्नर, घोडे, मंचर, नारायणगांव, आळें, बेल्हें येथील बागाइतदार, व्यापारी व शेतकरी याकरितां फळफळावळ, भाजीपाला व इतर मालवाहतुकीचें एक स्वस्त व जलद साधन उपलब्ध होईल.

( चेअरमनः धों. कृ. साठे, बी. ए., बी. एससी. मॅ. डायरेक्टरः शं. गो. नरवणे, एम. ई. ( कोलंबिया ), एम. एम. जी. आय., एल. एम. एम. आय. ए. )

---

### दि सुप्रीम म्युच्युअल अॅश्युरन्स कं. लि., पुणें

वरील विमा कंपनीनें १९४९ मध्यें २०,६०,२५० रु. चें काम पुरें केलें. इन्शुअरन्स नियमांतील २५ ( ब ) नियमाप्रमाणें खर्चाचें प्रमाण १७·५% पडलें. कंपनीला हप्त्यांचें एकूण उत्पन्न २,६२,१०७ रु. झालें. व्याजाचें उत्पन्न १५,४२८ रु. मिळालें. खर्च वजा जातां, लाइफ फंडांत १,२८,४४६ रुपयांची भर पडून तो ५,७४,८६५ रु. झाला. अहवालाचे वर्षी कंपनीकडे एकूण २१,५०० रुपयांचे क्लेम दाखल झाले व २४,५७० रुपयांचे क्लेम दिले गेले. सोलापूरच्या सुप्रीम म्युच्युअल कॉलनींत कंपनीनें ६६,३८१ रु. गुंतविलेले आहेत. कंपनीची वार्षिक सभा ३० जुलै रोजीं झाली. ( चेअरमनः एस. पी. आठवले, मुंबई. मॅनेजरः व्हॉ. एन. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी. सेक्रेटरीः टी. डी. देशपांडे, बी. ए., एलएल. बी. )

---

### टॉलस्टॉयच्या कन्येचें निधन


सुप्रसिद्ध रशियन कादंबरीकार लिओ टॉलस्टॉय ह्यांची कन्या कौंटेस टॉलस्टॉय ही आपल्या वयाच्या ८६ व्या वर्षी रोम येथें मृत्यु पावली. रशियांतून पळ काढल्यानंतर, १९३० पासून ती रोम येथें रहात होती.

---

### राजकुमारी नटीचें राजकुमारी थिएटर

सुप्रसिद्ध हिंदी नटी श्रीमती राजकुमारी हिनें आपल्या चित्रपट व्यवसायांतील मिळकतींतून मद्रास येथें एक थिएटर बांधलें आहे. त्याचें उद्घाटन श्री. एस. एस. वासन यांनीं नुकतेंच केलें. थिएटरचें नांव राजकुमारी असें आहे.


**मशिन्स् रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.**



**पेडणेकर आणि कं. लिमिटेड**
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२, गिरगांव रोड, मुंबई नं. ४.
फोन नं.–२२७३८

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापनाः १९४४ ]

**मुख्य कचेरीः–भोर, जि. पुणें.**

**शाखाः–पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंदुके.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरीः–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

आधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.






### सिमेंटचें उत्पादन

भारतांत १९५० मध्यें सुमारें २० लक्ष टन सिमेंटचें उत्पादन झालें. त्यापैकीं असोसिएटेड कंपनीज लि. ( त्यांत भारतांतील व प. पाकिस्तानांतील पुष्कळ कारखान्यांचा समावेश होतो. ) चा वाटा १४·५ लक्ष टन, पतियाळा सिमेंट कं. लि. चा १·५ लक्ष टन व डालमिया सिमेंट कं. लि. चा ०·९ लक्ष टन आहे. डालमिया कंपनीच्या तीन कारखान्यांपैकीं दोन कारखाने पाकिस्तानांत असून एक कारखाना भारतांत आहे. असोसिएटेड कंपनीवर फाळणीचा फारसा परिणाम झालेला नाहीं. १९४९ मधील तिच्या १६·५ लक्ष टन उत्पादनापैकीं फक्त २ लक्ष टन सिमेंट पाकिस्तानांतील कारखान्यांत तयार झालें आहे. सरकारनें सिमेंटच्या विक्रीच्या कमाल किंमती ठरवून दिलेल्या आहेत, त्या असोसिएटेड कं. लि. ला अनुकूल आहेत अशी इतर कारखानदारांची तक्रार आहे. ह्या कंपनीच्या उत्पादनखर्चावर ती विक्रीची किंमत आधारलेली आहे.

### मुंबई राज्यासाठी " कॉंटिंजन्सी फंड "

मुंबई राज्यासाठी लौकरच " कॉंटिंजन्सी फंड " उभारण्यांत येणार आहे. याबाबतचें बिल मुंबई सरकारच्या ता. ३ ऑक्टोबरच्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालें आहे.

कायदेमंडळाची मंजुरी मिळेपर्यंत कांहीं अचानक उद्भवणारे खर्च भागविण्यासाठी आगाऊ पैसे मिळण्याच्या दृष्टीनें राज्य कायदेमंडळानें असा फंड उभारावा अशी तरतूद भारतीय घटनेंत करण्यांत आली आहे.

या बिलान्वयें तीन कोटी रुपये या फंडाच्या नांवें ठेवण्याचा विचार आहे. या फंडाचें काम गव्हर्नरांच्या वतीनें अर्थखातें पाहील. कायदेमंडळानें पुरवणी खर्च मंजूर केल्याबरोबर किंवा आर्थिक सालअखेरीस, फंडांतून उचललेले पैसे फंडाला परत देण्यांत येतील.

### उद्योगविनियम केंद्रातर्फे आतांपर्यंत १०,००,००० लोकांना नोकऱ्या

गेल्या ऑगस्टमध्यें २,४२४ स्थलांतरित धरून एकूण २२,०२१ व्यक्तींना नोकऱ्या मिळवून देण्यांत आल्या असून उद्योगविनियम केंद्रांच्या सुरवातीपासून आतांपर्यंत मागील पांच वर्षांत नोकऱ्या मिळवून दिलेल्या व्यक्तींची संख्या १० लाखांवर गेली आहे. पूर्व पाकिस्तानांतून मोठ्या संख्येनें येणाऱ्या स्थलांतरितांमुळें नोकऱ्यांसाठी केल्या जाणाऱ्या नोंदणींत, विशेषतः पश्चिम बंगालमध्यें, बरीच वाढ झाली असून या महिन्यांतील एकूण नोंदणींपैकी ५० टक्के नांवें तेथें नोंदविली गेलीं. ९६,१३५ मालकांनीं नोकरांबाबतच्या आपल्या गरजा उद्योगविनिमय केंद्रांना कळविल्या.

### सर कसु एन. वाडिया

सर नेस वाडिया ह्यांचे वडील बंधु सर कसु एन वाडिया हे गेल्या आठवड्यांत जिनिव्हा येथें मृत्यु पावले. १९३४ मध्यें ते धंद्यांतून निवृत्त झाले, तेव्हांपासून त्यांचें वास्तव्य युरोपांत होतें. वाडिया बंधूंनीं मुंबईमधील कापड गिरण्यांच्या धंद्याचे वाढीस पुष्कळसा हातभार लाविलेला आहे. सर कसु वाडियांनीं १८९७ सालीं सेंचरी मिल्स स्थापन केली. बरेच वेळां ते गिरणी मालक संघाचे अध्यक्ष निवडून आले. त्यांनीं आजवर १,००,००,००० रु. चेवर रक्कम सार्वजनिक कार्यासाठी देणगीदाखल दिली आहे

### बद्रिनाथ मंदिरांत विजेचे दिवे

हिमालयांतील १२,००० फूट उंचीवरील बद्रिनाथ मंदिरांत लवकरच विजेचे दिवे सुरू होतील. विद्युत्करणाचें काम पुरें होत आलें असून १८ ऑक्टोबर रोजीं स्विच ओढून प्रकाश सुरू केला जाईल. हिमालयांतील देवळांपैकीं वीज प्रकाशाचा लाभ मिळणारें हें पहिलेंच देऊळ आहे.

### ॲग्रिकल्चरल व कॅटल शो कमिटी

मुंबई राज्यांत शेतकीविषयक व गुरांचीं प्रदर्शनें भरविण्याची योजना आंखण्यासाठी मुंबई सरकारनें श्री. के. व्ही. जोशी, एल. एजी. ( डेक्कन ॲ. असोसिएशनचे ऑ. सेक्रेटरी ) यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली आहे. श्री. के. आर. देशमुख ( सातारा ), श्री. बी. व्ही. धारपुरे ( क्युरेटर, लॉर्ड रे महाराष्ट्र इं. म्युझियम पुणें ) हे समितींचे इतर दोन बिनसरकारी सभासद आहेत: डॉ. एम्. बी. घाटगे ( डे. डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ), श्री. एस. एस. खोत. ( डे. डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ) व श्री. एस. के. वेडेकर ( अंडर सेक्रेटरी, शेती व जंगल खातें ) हेहि समितीचे सभासद असून श्री. वेडेकर हे समितीचे सेक्रेटरी म्हणूनहि काम करणार आहेत. मुंबई राज्यासाठी एक ॲग्रिकल्चरल ॲण्ड कॅटल शो कमिटी स्थापन करण्याची योजना कमिटीस आंखण्यास सांगितलेली आहे.

### अमेरिकेची माहिती देणारीं व्याख्यानें

युनायटेड स्टेटस् इन्फर्मेशन सर्व्हिसच्या कचेरीचे चित्रपट विभाग प्रमुख मि. रोज ह्यांनीं इन्फर्मेशन सर्व्हिसच्या ३१ देशांतील ४२ नोकरांसमवेत नुकतीच अमेरिकेस भेट दिली. मुंबईस परत आल्यावर त्यांनीं अनेक ठिकाणीं त्यांच्या अमेरिकेच्या प्रवासाची फिल्म्सच्या साहाय्यानें माहिती देणारीं व्याख्यानें दिलीं. पुण्यासहि लॉर्ड रे इं. म्यूझियममध्यें त्यांचीं एक-दोन व्याख्यानें होणार आहेत, असें समजतें.

विनोदाचा प्रचारासाठी उपयोग—अमेरिकेच्या परराष्ट्रीय खात्यानें हास्यरसात्मक पुस्तिकांचा राजकीय प्रचारासाठी उपयोग करण्याचें ठरविलें आहे. कोरियन युद्धांतील अमेरिकेची बाजू चित्ररूपानें दाखविणाऱ्या १०,००,००० विनोदी पुस्तिका वाटण्याचें खात्यानें ठरविलें आहे. चित्रांवरील मथळे अरेबिअन, पर्शिअन, बर्मीज आणि इंग्लिश भाषेंतून देण्यांत येणार आहेत.

४,६०८ नवीन पोस्ट-कचेऱ्या—भारत सरकारच्या पोस्ट आणि टेलिग्राफ खात्यानें ४,६०८ नवीन पोस्ट ऑफिसें उघडण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकीं २,००० पोस्ट कचेऱ्या मद्रास राज्यांत उघडण्यांत यावयाच्या आहेत. सध्या चार मोठ्या शहरांतून पोस्ट ऑफिसें रात्रींही उघडीं ठेवण्यांत आलीं आहेत. हा प्रयोग यशस्वी झाल्यास इतर मोठ्या शहरांतूनही ही व्यवस्था चालू करण्यांत येणार आहे असें समजतें.


## रक्कम गुंतविणारी व्यक्ति वा संस्था पाहिजे

कल्याण व आसपासच्या मोठ्या गांवच्या उत्तम प्रकारचे स्थावरावर सहा टक्के व्याजानें व सोन्याचांदीच्या कोणत्याहि प्रकारच्या लहान मोठ्या वस्तूंवर प्रत्येकीं व्हॅल्युएशनच्या ८० टक्के द. सा. द. शें. ५ रुपये व्याजानें रक्कम गुंतविणारी व्यक्ति वा संस्था पाहिजे. वेळोवेळीं मिळून भरपूर रक्कम उचलण्याची हमी व अत्यंत विश्वासू वागणूक.

मे. रानडे आणि कं., टिळक चौक, कल्याण

फोनः ३४५११ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन. टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन

श्री. गंगाराम सिद्राप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बॅंकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B., श्री. नी. ना. क्षीरसागर — मॅनेजिंग डायरेक्टर.

## बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

— संचालक मंडळ —

१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, ( चेअरमन )
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सीड्स मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक, बी. एस्सी., बी. ई., एलएल. बी.

सर्व प्रकारचे बॅंकिंगचे व्यवहार केले जातात.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.

ठेवीवर व्याज—

चालू खातें अर्धा टक्का, सेव्हिंग्ज १॥ टक्के, मुदत ठेव १ वर्ष २॥ टक्के, ३ वर्षे ३ टक्के.

शाखा स्थानिक—(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें. बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.

मुख्य ऑफिसः—४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे. मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२७ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.